PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Yeda Ki Khula
Year: 1991

Song: Ye Na Rani Yeshil Ka
Lyricist:

राणी...
राणी...
ये ना
अंहं
अगं ये ना
मुळीच नाही
ये ना राणी येशील का
ना ना दूर जरा होशील का
आगं ये ना राणी येशील का
ना ना दूर जरा होशील का
असा नखरा कशाला
हया मस्त घडीला
असा नखरा कशाला
हया मस्त घडीला
झुरतो फिरतो मरतो
गोड गोड बोलशील का

ये ना राणी येशील का
ना ना दूर जरा होशील का
ये ना राणी येशील का

जाळी जीवा आज
तुझा रूसवा असा हा
नाजूक नाजूक प्रीतीचा
गिरवू धडा हा
जाळी जीवा आज
तुझा रूसवा असा हा
नाजूक नाजूक प्रीतीचा
गिरवू धडा हा

जमायचं नाही गिरवायला
नको लागू तू माझ्या नादाला
गोंडा घोळशी कशाला
पिंगा घालशी कशाला
अवती भवती नजरा
भान काही ठेवशील का

ये ना राणी येशील का
ना ना दूर जरा होशील का
आगं राणी राणी ये ना
राणी येशील का
अगं रंग नवा ढंग नवा
गाल गुलाबी
हाल करी चाल तुझी
अदा शराबी
रंग नवा ढंग नवा
गाल गुलाबी
हाल करी चाल तुझी
अदा शराबी
भुलायची नाही बोलण्याला
नवा उपाय शोध तुझ्या झुरण्याला
भुलायची नाही बोलण्याला
नवा उपाय शोध तुझ्या झुरण्याला
नको जाळं बदामी
पुन्हा सांगते तुला मी
नको जाळं बदामी
पुन्हा सांगते तुला मी
का रे मजला छळशी
घरची वाट धरशील का

PlanetRead

Literacy for a Billion

ये ना राणी येशील का
ना ना दूर जरा होशील का
ये ना ये ना राणी येशील का

आरे रूसण्यातूनी
प्रेमाला येते गोडी रे मनमोरा
फुलवित येई शहारा
कशी नाजूक कळी तुझी फुलली
मन भ्रमराला अलगद भुलली

कशी नाजूक कळी तुझी फुलली
मन भ्रमराला अलगद भुलली
चल गंध लुटूया मिठी मधे मिटूया
चल गंध लुटूया मिठी मधे मिटूया
फुलवू बहरू लहरू
फुलराणी होशील का
ये ना राणी येशील का
जडली नाती जपशील का

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*